RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष ११, अंक ४१] गुरुवार, नोव्हेंबर १३, २०२५/कार्तिक २२, शके १९४७ [पृष्ठे १६, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ८१**

### प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ नोव्हेंबर २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७.**

क्रमांक मदुवआ-१२२५/प्र.क्र.१५३/ कामगार १०.— महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे आणि सेवाशर्तींचे विनियमन) नियम, २०१८ मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केलेला खालील नियमांचा मसुदा, महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना (नोकरीचे आणि सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा ६१) च्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्यासंदर्भात सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, या कायद्याच्या कलम ३७ च्या पोट-कलम (२) द्वारे आवश्यकतेप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे, ज्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी; आणि येथे सूचना देण्यात येत आहे की, ही अधिसूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या समाप्तीनंतर महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेतला जाईल.

**२.** उक्त प्रारूपाच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडून कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, 'ई' ब्लॉक, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई-४०० ०५१ येथे किंवा mahalabourcommr@gmail.com या ई-मेलवर पूर्वोक्त कालावधीत प्राप्त होतील असे कोणतेही आक्षेप किंवा सूचना विचारात घेईल.

## प्रारूप नियम

क्र.मदुवआ-१२२५/प्र.क्र.१५३/कामगार-१०:— महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे आणि सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) च्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि त्या संदर्भात सक्षम असलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे आणि सेवाशर्तींचे विनियमन) नियम, २०१८ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील नियम तयार करत आहे, हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट-कलम (२) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वीच प्रकाशित करण्यात आले आहेत, ते पुढीलप्रमाणे आहेत :-

**१.** या नियमांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे आणि सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२५ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे आणि सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा केला आहे) च्या नियम ३ मध्ये, "दहा" या मजकुराऐवजी "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**३.** मुख्य नियमांच्या नियम-८ मध्ये, "दहा" या मजकुराऐवजी "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**४.** मुख्य नियमांच्या नियम ११ मध्ये,-

(अ) पोट-नियम (१) मध्ये, "दहा" या मजकुराऐवजी "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) पोट-नियम (२) मध्ये, "दहा" या मजकुराऐवजी "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**५.** मुख्य नियमांच्या नियम १३ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"१३.- रात्री ९-३० ते सकाळी ७-०० या वेळेत आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांना पुरवावयाची सुरक्षितता, सुरक्षा उपाययोजना व सुरक्षा उपाय, भोगवटादार, आस्थापनांमध्ये महिला कामगारांसाठी सकाळी ७-०० पूर्वी आणि रात्री ९-३० नंतर, पुढील अटींची पूर्तता सुनिश्चित करील:-

(१) महिला कामगारांना त्यांच्या निवासस्थानापासून आस्थापनांमध्ये घेऊन जाण्यासाठी आणि पुन्हा घरी सोडण्यासाठी पुरेशा वाहतुकीच्या सुविधा पुरविण्यात येतील.

(२) शौचालये, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, कपडे बदलण्याची खोली, महिला कामगारांच्या प्रवेश करण्याच्या व बाहेर पडण्याच्या सोयी व सुविधांसह कामाचे ठिकाण, चांगले प्रकाशमान असेल.

(३) कोणत्याही कामाच्या ठिकाणी किमान दोन महिला कामगार कर्तव्यावर उपस्थित राहतील.

(४) रात्र पाळीमध्ये व नियमित पाळीमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांना, दर आठ आठवड्यातून एकदा तक्रार दिन म्हणून त्यांच्या प्रतिनिधींमार्फत व्यवस्थापकाबरोबर बैठक घेता येईल आणि व्यवस्थापक, तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न करील.

(५) अशा कामासाठी व अशा कालावधीसाठी प्रत्येक महिला कामगाराची नमुना "ल" मध्ये लेखी संमती घेण्यात येईल आणि ती तीन वर्षांसाठी जतन करण्यात येईल.

(६) किमान पंचेचाळीस दिवसांची रेकॉर्डिंगची सुविधा असलेली सीसीटीव्ही संनिरीक्षण यंत्रणा बसवण्यासह, महिला कामगारांच्या सुरक्षेसाठी व सुरक्षिततेसाठी सर्व व्यवहार्य उपाययोजना केल्याची सुनिश्चित करण्यात येईल".

**६.** मुख्य नियमांसोबत जोडलेल्या नमुना-"ह" मध्ये, "दहा" या मजकुराऐवजी "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**७.** मुख्य नियमांसोबत जोडलेल्या नमुना-"जे" मध्ये, "दहा" या मजकुराऐवजी "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**८.** मुख्य नियमांसोबत जोडलेल्या नमुना-"के" मध्ये, "दहा" या मजकुराऐवजी "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**नमुना- "ह"**

(नियम ९ पहा)

**व्यवसाय सुरू केल्याची सूचना दिलेल्या आस्थापनांची नोंदवही**

**(२० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांसाठी)**

| अ.क्र. | सूचना पावतीचा क्रमांक व दिनांक | आस्थापनेचे नाव व पत्ता | मालकाचे नाव व निवासी पत्ता | असल्यास, प्राधिकृत व्यक्तीचे आणि व्यवस्थापकाचे नाव व निवासी पत्ता | आस्थापना सार्वजनिक/खाजगी क्षेत्रात मोडते किंवा कसे | आस्थापनेला संलग्न असलेले परंतु आस्थापनेपासून निराळ्या ठिकाणी असलेले कार्यालय, भांडारगृह, गोदाम किंवा कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| | | | | | | |

| व्यवसाय सुरु केल्याची तारीख | व्यवसायाचे स्वरूप | मालकाच्या कुटुंबातील आस्थापनेत काम करीत असलेल्या व्यक्तींची संख्या.(पुरुष/स्त्री) | एकूण कामगार संख्या (अंशकालिक कामगारांसह) |
|---|---|---|---|
| ८. | ९. | १०. | ११. |
| | | | |

## नमुना "जे"

(नियम 11 (1) पहा)

## व्यवसाय बंद केल्याबाबत सूचना

## (२० व त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांकरिता)

प्रति,
सुविधाकार,
कार्यालयाचा पत्ता

विषय : आस्थापनेचा व्यवसाय बंद केल्याबाबत व आस्थापनेचे नाव आस्थापनांच्या नोंदवहीतून वगळण्याबाबत.

महोदय,

मी/आम्ही, आपणास कळवू इच्छितो/ इच्छिते की, माझ्या/आमच्या आस्थापनेचा व्यवसाय कायम स्वरूपी बंद केला असून त्या आस्थापनेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

तरी मी/आम्ही, आपणास विनंती करतो/ करते की, आमच्या आस्थापनेचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करून आस्थापनेचे नाव आपल्या अभिलेखातील नोंदवहीतून वगळण्यात यावे.

**आस्थापनेचा तपशील**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक | | | | |
| २. | वैधता कालावधी | | | | |
| ३. | आस्थापनेचे नाव | | | | |
| ४. | आस्थापनेचा पत्ता | | | | |
| ५. | नोंदणीकृत / मुख्य कार्यालयाचा पत्ता, असल्यास, | | | | |
| ६. | आस्थापनेचा प्रकार | | (मालक / भागीदारी / एलएलपी / कंपनी / विश्वस्त मंडळ / सहकारी संस्था / मंडळ) | | |
| ७. | (अ) व्यवसायाचे वर्गीकरण | | | | |
| | (ब) व्यवसायाचे स्वरूप | | | | |
| ८. | मालकाचे नाव व निवासी पत्ता | | | | |
| ९. | मालक / भागीदार / संचालक / संस्था / मंडळ सदस्य / सदस्य यांचा तपशील | | | | |
| १०. | प्राधिकृत व्यक्तीचे नाव व निवासी पत्ता, असल्यास | | नाव व ई-मेल पत्ता | आधार कार्ड क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
| | | | | | |
| ११. | व्यवस्थापकाचे नाव व निवासी पत्ता, असल्यास | | नाव व ई-मेल पत्ता | आधार कार्ड क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
| | | | | | |
| १२. | कामगारांचा तपशील | | पुरुष | स्त्री | एकूण |
| | | | | | |
| १३. | व्यवसाय बंद केल्याचा दिनांक | | | | |
| १४ | व्यवसाय बंद केल्याची कारणे. | | | | |

## स्वयं-घोषणापत्र

मी/आम्ही, याद्वारे गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो/ करते आणि असे नमूद करतो/ करते की, मी/आम्ही केलेल्या व्यवसायावर कोणताही अधिनियम, नियम, कायदा किंवा कोणत्याही विधी न्यायालयाचा अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश याद्वारे बंदी घालण्यात आलेली नव्हती किंवा मनाई करण्यात आलेली नव्हती आणि मी आम्ही ज्या जागेत उक्त व्यवसाय करीत होतो तेथे कोणताही अधिनियम, नियम, कोणत्याही न्यायालयाचा अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश यांचे उल्लंघन झालेले नव्हते.

मी/आम्ही, याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, माझ्या आमच्या वैयक्तिक ज्ञानानुसार, माहितीप्रमाणे व विश्वासानुसार खरी व बिनचूक आहे. चुकीची माहिती देण्याच्या परिणामाची मला/आम्हाला पूर्ण जाणीव आहे. दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास मी/आम्ही भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) अन्वये किंवा त्यासंबंधात लागू असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये खटला भरण्यासाठी व शिक्षेसाठी पात्र आहे/ आहोत.

दिनांक:

ठिकाण:

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

**नमुना - "के"**

[नियम ११ (२) पहा]

**व्यवसाय बंद केल्याबाबत सूचना**

**(२० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांकरिता)**

प्रति,
सुविधाकार,
कार्यालयाचा पत्ता

विषय : आस्थापनेचा व्यवसाय बंद केल्याबाबत व आस्थापनेचे नाव नोंदवहीतून वगळण्याबाबत.

महोदय,

मी/आम्ही आपणास कळवू इच्छितो/इच्छिते की, माझ्या/आमच्या आस्थापनेचा व्यवसाय कायम स्वरूपी बंद करण्यात आलेला असून त्या आस्थापनेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

तरी मी/आम्ही आपणांस विनंती करतो/ करते की, आमच्या आस्थापनेचे नाव आपल्या अभिलेखातील नोंदवहीतून वगळण्यात यावे.

**आस्थापनेचा तपशील**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सूचना पत्र पावतीचा क्रमांक | | | | |
| २. | आस्थापनेचे नाव | | | | |
| ३. | आस्थापनेचा पत्ता | | | | |
| ४. | नोंदणीकृत / मुख्य कार्यालयाचा पत्ता, असल्यास, | | | | |
| ५. | आस्थापनेचा प्रकार | | मालक / भागीदारी / एलएलपी / कंपनी / विश्वस्त मंडळ / सहकारी संस्था / मंडळ | | |
| ६. | (अ) व्यवसायाचे वर्गीकरण | | | | |
| | (ब) व्यवसायाचे स्वरुप | | | | |
| ७. | मालकाचे नाव व निवासी पत्ता | | | | |
| ८. | भागीदार/ संचालक/ विश्वस्त मंडळ / मंडळ सदस्य / सदस्य यांचा तपशील | | | | |
| ९. | प्राधिकृत व्यक्तीचे नाव व निवासी पत्ता, असल्यास नाव | | नाव व ई-मेल पत्ता | आधार कार्ड क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
| | | | | | |
| १०. | व्यवस्थापकाचे नाव व निवासी पत्ता, असल्यास | | नाव व ई-मेल पत्ता | आधार कार्ड क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
| | | | | | |
| ११. | कामगारांचा तपशील | | पुरुष | स्त्री | एकूण |
| | | | | | |
| १२. | व्यवसाय बंद केल्याचा दिनांक | | | | |
| १३. | व्यवसाय बंद केल्याची कारणे | | | | |

## स्वयं-घोषणापत्र

मी/आम्ही, याद्वारे गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो/ करते आणि असे नमूद करतो/ करते की, मी/आम्ही केलेल्या व्यवसायावर कोणताही अधिनियम, नियम, कायदा किंवा कोणत्याही विधी न्यायालयाचा अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश याद्वारे बंदी घालण्यात आलेली नव्हती किंवा मनाई करण्यात आलेली नव्हती आणि मी आम्ही ज्या जागेत उक्त व्यवसाय करीत होतो तेथे कोणताही अधिनियम, नियम, कोणत्याही न्यायालयाचा अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश यांचे उल्लंघन झालेले नव्हते.

मी/आम्ही, याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, माझ्या आमच्या वैयक्तिक ज्ञानानुसार, माहितीप्रमाणे व विश्वासानुसार खरी व बिनचूक आहे. चुकीची माहिती देण्याच्या परिणामाची मला/आम्हाला पूर्ण जाणीव आहे. दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास मी/आम्ही भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) अन्वये किंवा त्यासंबंधात लागू असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये खटला भरण्यासाठी व शिक्षेसाठी पात्र आहे/ आहोत.

दिनांक:

ठिकाण:

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी ·

**नमुना - "ल"**

(नियम १३ पहा)

**रात्रपाळीत काम करण्याकरिता महिला कामगाराची संमती.**

मी श्रीमती / कुमारी ........................................................................ राहणार ............................ ........................................................................................................................., (संपूर्ण पत्ता) असे नमूद करते की, मी....................................................................................................या पदावर दिनांक ..................................... पासून काम करीत आहे.

मला याची जाणीव आहे की,

मला, माझ्या निवासाच्या दारापासून व कामाच्या ठिकाणापर्यंत व त्याप्रमाणे उलट नियोक्त्याद्वारे सुस्थितीत व सुरक्षित असलेली स्वतंत्र वाहतुकीची सुविधा पुरवण्यात येणार आहे व किमान दोन महिला कर्मचारी रात्रपाळीच्या कामावर असतील आणि कामाच्या ठिकाणी लैंगिक छळास प्रतिबंध करणारी समिती श्रीमती...................................................... यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहे.

त्यामुळे दिनांक ........................................................................ पासून दिनांक ........................................................................ पर्यंतच्या कालावधीत रात्रपाळीत काम करण्याची माझी संमती आहे.

दिनांक :

ठिकाण : महिला कामगाराची स्वाक्षरी,

साक्षीदाराचे नाव, पत्ता व स्वाक्षरी,

१. .......................................................

२. .......................................................

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रोशनी कदम-पाटील**

शासनाचे उप सचिव.

**INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,

Mumbai 400 032, dated 12th November 2025.

*NOTIFICATION*

Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017.

No. MSA-1225/C.R. 153 /Lab-10.— The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to amend the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2018, in exercise of the powers conferred by sub- section (*1*) of section 37 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017), and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*2*) of section 37 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after the expiry of forty-five days from the date on which the draft rules are published in the *Maharashtra Government Gazette*.

**2.** Any objection or suggestion which may be received by the Commissioner of Labour, Maharashtra State, Kamgar Bhavan, 'E' Block, C-20, Bandra-Kurla Complex, Bandra East, Mumbai 400 051 or on email *mahalabourcommr@gmail.com* from any person with respect to the said draft, within the aforesaid period, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

No. MSA-1225/C.R.153/Lab-10.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 37 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service), Rules, 2018 the same having been previously published as required by sub-section (*2*) of section 37 of the said Act, as follows, namely:-

**1.** These rules may be called the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) (Amendment) Rules, 2025.

**2.** In rule 3 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2025 (hereinafter referred to as "the principal Rules") for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

**3.** In rule-8 of the principal Rules, for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

**4.** In rule 11 of the principal Rules,-

(a) in sub-rule (1), for the word "ten" the word "twenty" shall be substituted;

(b) in sub-rule (2), for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

**5.** For rule 13 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely:-

"**13.**- Safety, security measures and safeguards to be provided to women workers working in establishments between 9-30 p.m. to 7-00 a.m.- The occupier shall, for employment of women, in Shop and Establishments before 7-00 a.m. and beyond 9-30 p.m., ensure the following conditions, namely:-

(1) Adequate transportation facilities shall be provided to women worker to pick-up from her residence and drop to establishment and *vice-versa*.

(2) The workplace including passage towards conveniences and facilities concerning toilets, washrooms, drinking water, changing room, entry and exit of women worker should be well-lit.

(3) Minimum two women workers shall be present on duty at any work place.

(4) The women worker, who work in night shifts and regular shifts, shall have a meeting through their representatives with the manager, once in eight weeks as grievance day and the manager shall try to comply with grievances.

(5) Written consent of each woman worker for such work and for such period, shall be obtained in Form "L" and preserved for three years.

(6) All reasonably practicable measures shall be ensured for the safety and security of women worker including installation of CCTV surveillance with recording facilities for at least forty-five days.".

**6.** In Form "H" appended to the principal Rules, in the heading for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

**7.** In Form "J" appended to the principal Rules, in the heading for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

**8.** In Form "K" appended to the principal Rules, in the heading for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

**Form - 'H'**

**(See rule 9)**

**REGISTER OF ESTABLISHMENT WHO HAVE GIVEN INTIMATION**

**(For Establishment engaging less than twenty workers)**

| Sr. No. | Intimation Receipt No. with Date | Name and Address of the Establishment | Name and residential address of the Employer | Name residential and address of the Authorised Person and Manager | Whether establishment falls under public/ private sector |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| | | | | | |
| | | | | | |

| Situation of office, showroom, godown, warehouse or workplace, if any, attached to the establishment but situated in premises different from those of the establishment | Date of Commencement of business | Nature of the business | No. of family members of employer employed in the establishment (Men/Women) | Total No. of Workers [Including part time workers |
|---|---|---|---|---|
| 7. | 8. | 9. | 10. | 11. |
| | | | | |
| | | | | |

**Form - 'J'**

**(See rule 11(1))**

**INTIMATION OF CLOSING OF BUSINESS**

(For Establishment engaging more than twenty workers)

To,
The Facilitator,
Office address.

Subject: Closing of business and removal of the name of the Establishment from the Register.

Dear Sir,

I/We wish to inform you that I/We have permanently closed the business of the establishment as per the details mentioned below:-

I/We request you to cancel our Registration number and remove the name of our establishment from your records.

**Details of Establishment.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Registration Certificate no. | :- | | | |
| 2 | Validity period | :- | | | |
| 3 | Name of the Establishment | :- | | | |
| 4 | Address of place of establishment | :- | | | |
| 5 | Registered/ principal office address, if any. | :- | | | |
| 6 | Type of organization | :- | Proprietor, Partnership, LLP, Company/Trust/ Society/ Board | | |
| 7 | (A)Category of business<br>(B)Nature of business | :- | | | |
| 8 | Name and residential address of the Proprietor | :- | | | |
| 9 | Details of the Partner / Director/ Trust/Board Member/Member | :- | | | |
| 10 | Name and residential address of Authorized person, if any. | :- | Name and e-mail | Aadhar Card No. | Mobile No. |
| | | | | | |
| 11 | Name and residential address of Manager, if any. | :- | Name and e-mail | Aadhar Card No. | Mobile No. |
| | | | | | |
| 12 | Manpower Details | :- | Men | Women | Total |
| | | | | | |
| 13 | Date of closing of business | :- | | | |
| 14 | Reasons for closing of business | :- | | | |

**Self-Declaration**

I/ We hereby solemnly affirm and state that the business which I/we had started was not banned or prohibited by any Act, Rules, Law or Order of any Court of Law or any competent authority and the premises where I was/ we were conducting the said business was free from violation of any Act, Rules, Order of any Court of Law or any Competent Authority.

I/ We hereby declare that the information provided above is true and correct to the best of my personal knowledge, information and belief. I am/ We are fully aware about the consequences of giving false information. If the information is found to be false, I/We shall be liable for prosecution and punishment under the Indian Penal Code (45 of 1860) and/or any other law applicable thereto.

Date:

Place:

Name and Signature of Applicant.

**Form - 'K'**

**(See rule 11(2))**

**INTIMATION OF CLOSING OF BUSINESS**

(For establishment engaging less than twenty workers)

To,

The Facilitator,

Office address.

Subject: Closing of business and removal of the name of the Establishment from the Register.

Dear Sir,

I/We wish to inform you that I/We have permanently closed the business of the establishment as per the details mentioned below:-

I/We request you to remove the name of our establishment from your register.

**Details of Establishment.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Intimation Receipt no. | :- | | | |
| 2 | Name of the Establishment | :- | | | |
| 3 | Address of place of establishment | :- | | | |
| 4 | Registered/ principal office address, if any. | :- | | | |
| 5 | Type of organization | :- | Proprietor, Partnership, LLP, Company/Trust/Society/ Board | | |
| 6 | (A) Category of business<br>(B) Nature of business | :- | | | |
| 7 | Name & Residential Address of the Proprietor | :- | | | |
| 8 | Details of the Partner / Director/Trust/Board Member/Member | :- | | | |
| 9 | Name and Residential Address of Authorized person, if any. | :- | Name and e-mail | Aadhar Card No. | Mobile No. |
| | | | | | |
| 10 | Name and Residential Address of Manager, if any. | :- | Name and e-mail | Aadhar Card No. | Mobile No. |
| | | | | | |
| 11 | Manpower Details | :- | Men | Women | Total |
| | | | | | |
| 12 | Date of closing of business | :- | | | |
| 13 | Reasons for closing of business. | :- | | | |

## Self- Declaration

I/ We hereby solemnly affirm and state that the business which I/we had started was not banned or prohibited by any Act, Rules, Law or Order of any Court of Law or any competent authority and the premises where I was/ we were conducting the said business was free from violation of any Act, Rules, Order of any Court of Law or any Competent Authority.

I/ We hereby declare that the information provided above is true and correct to the best of my personal knowledge, information and belief. I am/ We are fully aware about the consequences of giving false information. If the information is found to be false, I/We shall be liable for prosecution and punishment under the Indian Penal Code (45 of 1860) and /or any other law applicable thereto.

Date:

Place: Name and Signature of Applicant.

**Form - 'L'**

**(See rule 13)**

**CONSENT OF WOMEN WORKER TO WORK IN NIGHT SHIFT**

I Miss/Smt. ------------------------------------------------------------------residing at------------------------------------
--------------------------------------------------------------------------- (Full Address)

State that I am working as (Designation)---------------------------in M/s.---------------------------------------------
----------------------------------since-----------------------------------------------------I am aware that, -

the employer will provide separate safe and secure transport facility from the doorstep of my residence to the place of work and vice-versa\-and that there will be at least two women worker working in the nightshift and that there is a Committee to prevent sexual harassment at work place under the Chairmanship of Smt.----
--------------------------------------------------------------

I am therefore willing to work at nightshift for the period from -------------- to---------- period.

period.

Date:

Place: Signature of the Women worker.

Name, address and Signature of witnesses

1.-------------------------------------

2.-------------------------------------

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ROSHANI KADAM-PATIL,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.